# बातमीपत्र- मार्च २०२६

**जपूया संस्कृती, विणूया नाती**

**६-९ ऑगस्ट २०२६, सिॲटल**



बीएमएम२०२६ सिॲटल्- बातमीपत्राच्या सर्व वाचकांना नमस्कार.. तिथीने येणाऱ्या शिवजयंतीच्या तसेच गुढीपाडव्याच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!!! नवीन मराठी वर्ष आपल्या सर्वांना सुखाचे, समृद्धीचे आणि आरोग्यसंपन्न जावो ही सदिच्छा . 🌸

**संमेलन आता अवघ्या ५ महिन्यांवर येऊन ठेपले आहे!** कार्यकर्त्यांच्या कामाला आता अक्षरशः वेग आला आहे आणि सर्व समित्या पूर्ण जोमाने तयारीला लागल्या आहेत. नियोजन, बैठका, कार्यक्रमांची आणि विविध उपक्रमांची आखणी यामध्ये सगळ्यांचा उत्साह ओसंडून वाहत आहे.

**तिकीटविक्री जोरात सुरू आहे**. आपले स्थान निश्चित करण्यासाठी आणि पहिल्या टप्प्यातील कमी दराचा फायदा घ्यायचा असेल तर तिकीटे आत्ताच बुक करा! 😉 **गुढीपाडव्यानंतर म्हणजेच १९ मार्च नंतर तिकिटांचे दर वाढणार आहेत**, त्यामुळे उशीर करू नका. लवकर नोंदणी केल्यास मुख्य प्रेक्षागृहात पुढील रांगेत बसण्याची संधी मिळू शकते. मित्र-मैत्रिणींसोबत एकत्र बसायचे असल्यास आपल्या शहरातील मराठी मंडळाशी संपर्क साधा. अन्यथा थेट संमेलनाच्या संकेतस्थळावर नोंदणी करा: 👉
https://bmmseattle2026.org/bmm2026

## नवीन काय?

### भोजन-विरहित नवीन तिकीट - फक्त $३५०.००

ज्यांना सकाळची न्याहरी आणि दुपारचे, रात्रीचे भोजन नको असेल त्यांच्यासाठी हे खास तिकीट आम्ही लवकरच  उपलब्ध करून देत आहोत. न्याहरी/भोजन हवे असल्यास अतिरिक्त शुल्क भरावे लागेल.

### ‘ती’चा सन्मान: Celebration of Womanhood

बीएमएम२०२६ प्रवासाच्या केंद्रस्थानी आहे — ‘ती’चा सन्मान; स्त्रीत्वाचा सन्मान 💐 🙏🏼
‘ती’ म्हणजे उर्मी, ऊर्जा, प्रेम, महत्वाकांक्षा आणि जबाबदारी; ती आपली मायभूमी, मायबोली, संस्कृती आणि अस्मिता. माता, भगिनी, मुलगी, पत्नी, प्रियसी, मैत्रीण – नाती विणणारी, भाषा जपणारी, परंपरा पुढे नेणारी, मूल्ये जपणारी आणि पुढील पिढीला दिशा देणारी शक्ती.

बीएमएम२०२६ केवळ साडेतीन दिवसांचा कार्यक्रम नाही; हा स्थानिक ते जागतिक मराठी समुदायाला जोडणारा प्रेरणादायी प्रवास आहे. या  प्रवासाचा एक भाग म्हणून, ऑगस्टपर्यंत दर महिन्याला उत्तर अमेरिकेतील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या **प्रेरणादायी स्त्रियांचा** गौरव करण्यात येईल. आपल्या मराठी मंडळातील ज्या स्त्रियांनी त्यांच्या क्षेत्रात असाधारण, प्रेरणादायी व उल्लेखनीय काम केले आहे, अशा स्त्रियांची नामांकने (किमान ४–५) आम्हाला पाठवावीत ही नम्र विनंती. मंडळ अध्यक्षांनी त्यांच्या मंडळाच्या (अध्यक्षाच्या) अधिकृत ई-मेल ID वरून ही नामांकने पाठवावीत. ई-मेल TichaSanmaan@bmmseattle2026.org  या पत्त्यावर पाठवावे.

कृपया प्रत्येक नामांकनासोबत पुढील माहिती पाठवा:

1. स्त्रीचे पूर्ण नाव
2. फोटो, ई-मेल आणि फोन नंबर
3. कार्याची सविस्तर माहिती / Resume
4. नामांकन पाठवणाऱ्या मंडळ अध्यक्षांचे नाव आणि संपर्क नंबर

**टीप:** कार्याची माहिती MS Word फाइलमध्ये attach करा; फोटो स्वतंत्रपणे attach करा.

संपूर्ण अमेरिकेतून प्राप्त झालेल्या नामांकनांमधून आमची निवड समिती दर महिन्यासाठी २ नावांची निवड करून त्या स्त्रियांचा (व्हिडियो स्वरूपात) सन्मान करेल. हा उपक्रम पुढील पिढीसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल, असा आम्हाला विश्वास आहे. आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे.

## बीएमएम२०२६ शुभंकर (Mascot)- ' रेनियर राणी'




सिॲटलच्या पॅसिफिक वायव्य (नॉर्थवेस्ट) किनाऱ्यावर, समुद्राच्या गाजेत आणि ढोल-ताशाच्या गजरात आता चमकणार आहे बीएमएम२०२६ ची शुभंकर - **रेनियर राणी**! 👑
Orca Whale वॉशिंग्टन राज्याचा राज्य समुद्री प्राणी आहे. बीएमएम२०२६साठी आम्ही female Orca ला शुभंकर म्हणून निवडले आहे.

रेनियर राणी फक्त उत्सवाची प्रतिमा नाही; ती स्त्रीत्वाचा सन्मान, सामर्थ्य आणि संस्कृतीची वाहक आहे. तिच्या नावात आहे वॉशिंग्टन राज्यातले प्रसिद्ध शिखर माऊंट रेनिअर आणि तिच्या पेहरावात साकारली आहे महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख. माऊंट रेनिअर भेटतो सह्याद्रीला, सिॲटल भेटते महाराष्ट्राला  आणि  या सुंदर मिलाफातून रेनियर राणी प्रत्येक पिढीला संस्कृती जपण्याची प्रेरणा देते. रेनिअर राणी समवेत प्रत्येक उपस्थिताचा स्नेहसंमेलनाचा अनुभव निश्चितच अजून उत्साही आणि स्मरणीय बनेल. ✨

## 🌟 कार्यक्रमांची घोषणा 🌟

मागील महिन्यात जाहीर झालेल्या कार्यक्रमांबरोबरच अजून काही नवीन कार्यक्रम निश्चित झाले आहेत.
🎤मान्यवर वक्त्यांचे विविध विषयांवर मौलिक विचार त्यांच्या खुमासदार शैलीत..
**अविनाश धर्माधिकारी**: स्वातंत्र्यानंतर १०० वर्षांनंतरचा भारत
**निलेश ओक**: वेदकालीन भारत
**डॉ आनंद नाडकर्णी**: फुल्ल टेन्शन ते कुल टेन्शन
**संजय उपाध्ये:** घर करा रे प्रसन्न!
🌎 व्हॅन्कुव्हर, पोर्टलंड आणि शिकागो येथील स्थानिक कलाकारांचे कार्यक्रम.

---

## 🏆 स्पर्धा विभाग

• ढोल-ताशा आणि स्मरणिका कथा या स्पर्धांची नोंदणी आता पूर्ण झाली आहे. सर्व सहभागी संघांचे आणि एकल सहभागींचे मनःपूर्वक अभिनंदन!! 👏🏼👏🏼🎉

• उत्तर अमेरिकेतील अनेक गुणी कलाकारांसाठी सुवर्णसंधी – बीएमएम २०२६ **स्वरमंच** गायन स्पर्धा
मार्गदर्शक आणि परीक्षक: प्रख्यात संगीतकार व गायक डॉ. सलील कुलकर्णी
लोकाग्रहास्तव 'स्वरमंच' स्पर्धेची अंतिम तारीख १५ मार्च पर्यंत वाढवण्यात आली आहे.
प्रश्नांसाठी: naprogramsmusic@bmmseattle2026.org

• कलास्पंदन कला दालन आयोजित — "रंग महाराष्ट्राचे!"
कलास्पंदन कला दालन स्पर्धेसाठी **नोंदणी १ मार्चपासून** सुरू होत आहे. अंतिम तारीख: ३१ मे, २०२६
स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कलाकार प्रमोद कुर्लेकरआणि सुचित्रा भोसले हे मान्यवर परीक्षक म्हणून लाभणार आहेत. अधिक माहितीसाठी व स्पर्धेच्या नियमावलीसाठी भेट द्या:
https://bmmseattle2026.org/kalaspandan-artgallery
काहीही प्रश्न असल्यास आम्हाला ईमेल करा: kalaspandan@bmmseattle2026.org
तसेच माहिती आणि प्रश्नोत्तरे यासाठी आयोजित केलेल्या Teams मीटिंगला उपस्थित राहून थेट संवाद साधू शकता:  दिनांक: रविवार, ८ मार्च, २०२६; सकाळी १० ते ११
Link: https://teams.microsoft.com/meet/2991154529639?p=MqKJSkDLvhQ70xsYbA
Meeting ID: 299 115 452 963 9

**नोंदणी चालू असलेल्या इतर स्पर्धा:**
• स्मरणिका मुखपृष्ठ स्पर्धा
• नांदा हास्य भरे – स्टँडअप कॉमेडी
• नृत्य झंकार – शास्त्रीय व उपशास्त्रीय नृत्य
• नाच ग घुमा, नाच रे पोरा – लोकनृत्य
• चला मंगळागौर खेळूया
सर्व स्पर्धांची माहिती: 👉 https://bmmseattle2026.org/competitions

## Day 0 बीएमएम उपक्रम:

**BMM flagship CME कार्यक्रमासाठी आजच नोंदणी करा!**
आरोग्य क्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञांच्या विशेष मेळाव्यात सहभागी होण्याचे आम्ही आपल्याला मनापासून आमंत्रण देतो. हा **Continuing Medical Education** अनुभव क्लिनिकल उत्कृष्टता अधिक समृद्ध करण्यासाठी आणि अर्थपूर्ण सहकार्य वाढवण्यासाठी तयार करण्यात आला आहे. आपले ज्ञान वृद्धिंगत करा. आपले व्यावसायिक जाळे (नेटवर्क) अधिक मजबूत करा. क्लिनिकल उत्कृष्टतेकडे नवे पाऊल टाका.
चहा, अल्पोपहार आणि विनामूल्य भोजनासह सहकाऱ्यांशी संवाद आणि नेटवर्किंगची उत्तम संधी लाभेल.
आजच नोंदणी करा!

बीएमएम२०२६ **च्या Day 0 साठी बालतरंग–किशोरकुंज** अंतर्गत नॉर्थ अमेरिकेतील मुलांना कार्यक्रम सादरीकरणांसाठी प्रस्ताव (RFP) पाठवण्याचे आमंत्रण आहे. सिॲटल बाहेरील सर्व मुलांना सहभागी होण्याची संधी मिळावी म्हणून नोंदणी तारीख ५ मार्च २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी आणि प्रस्ताव पाठवण्यासाठी येथे भेट द्या: https://bmmseattle2026.org/baltarang-kishorekunj

**Business Connect आणि Real Estate conference**: हे कार्यक्रम/परिषदा Day Zero ला असणार आहेत. परिषदेची तयारी करण्यासाठी कार्यकर्ते मोठ्या उत्साहाने काम करत आहेत. आमची प्रायोजक पॅकेजेस आता प्रकाशित झाली आहेत.
https://bmmseattle2026.org/bmm-initiatives-sponsorships
काही प्रश्न असल्यास कृपया इथे संपर्क साधा. ईमेल: bconnect@bmmseattle2026.org

आपल्या सहकार्याने हे स्नेहसंमेलन नव्या उंचीवर जाईल. मराठी संस्कृतीच्या या जल्लोषात देणगी स्वरूपात आपला वाटा नक्की उचला. संपर्क: donations@bmmseattle2026.org
🙏 Be a Donor – Support Us

आपल्या सततच्या पाठिंबा, विश्वास आणि सहभागाबद्दल आपणा सर्वांचे मनःपूर्वक आभार 🙏 संस्कृती, साहित्य आणि कलेचा आस्वाद घेण्यासाठी तसेच मैत्रीच्या गाठी बांधण्यासाठी ६ ते ९ ऑगस्टदरम्यान सिॲटल् मध्ये प्रत्यक्ष भेटूया!
तोवर आमच्या समाज माध्यमांवर भेटत राहू 👇🏻

संकेतस्थळ: https://bmmseattle2026.org

यूट्यूब वाहिनी: https://www.youtube.com/@BMM2026SEATTLE

फेसबुक पेज: https://www.facebook.com/bmm2026seattle

फेसबुक ग्रुप: https://www.facebook.com/groups/bmm2026seattle

इंस्टाग्राम: https://www.instagram.com/bmm2026seattle

इमेल-पत्ता: स्नेहसंमेलनासंबंधीच्या सूचना, अभिप्राय आणि प्रश्नांसाठी - info@bmmseattle2026.org

आपला विश्वास, आपली साथ  हाच आमचा प्रेरणा स्रोत आहे.
चला,
**जपूया संस्कृती, विणूया नाती !!!**
🙏 🌸

अश्विनी क्षीरसागर,

(बीएमएम२०२६ समिती)